# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**(वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय)**

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

**डॉ. ए. एस. चंद्रमौली**
वित्त व लेखा अधिकारी
ई.मेल :Fao@unigug.ac.in

संकेतस्थळ : www.unigug.ac.in
ई.मेल :faogug@gmail.com
दुरध्वणी क्र. : ०७१३२-२२३१०६


जावक क्रमांक/गो.वि./वि.ले.वि./३६८०/२०२३

दिनांक :२३/०३/२०२३

## आवाहन पत्र

**विषय :- प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना सुवर्ण पदक देवून गौरव करण्यासाठी देणगी मिळण्यासाठी आवाहन पत्र.**

गोंडवाना विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात विविध विद्याशाखेतील प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा सुवर्ण पदक देवून गौरव करण्यात येतो. याकरीता सन्माननीय दानदाते यांचेकडुन रू. १,५०,०००/- रक्कमेची देणगी स्विकारण्यात येते व या देणगीवर प्राप्त होणाऱ्या व्याजाच्या रकमेतुन सन्माननीय दानदात्यांनी देणगी देताना ठरवून दिलेल्या नावाने प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना दरवर्षी सुवर्ण पदक देवून गौरव करण्यात येतो. दीक्षांत समारंभ कार्यक्रमास विद्यापीठाचे अतिथी म्हणुन या सन्माननीय दानदात्यांना आमंत्रीत सुध्दा करण्यात येते.

सन्माननीय दानदात्यांच्या देणगीतुन सुवर्ण पदक मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासु व जिज्ञासुवृत्तीस चालना मिळण्यास, संशोधन कार्यास प्रोत्साहन मिळण्यास मदत होते. सन्माननीय दानदात्यांची सामाजिक आपुलकीशी बांधिलकी यातुन व्यक्त होत असुन उच्च शिक्षणामध्ये त्यांचे बहुमुल्य योगदान नोंदविले जात असते.

आपण सामाजिक बांधिलकीतुन रू. १,५०,०००/- (एक लक्ष पन्नास हजार फक्त) ची देणगी विद्यापीठास सुवर्ण पदकासाठी देवून व विद्यापीठाचे दानदाते होवून विद्यापीठाच्या शैक्षणिक कार्यात सहभागी व्हावे व विद्यापीठास उपकृत करावे, अशी आवाहन वजा विनंती यान्वये सर्व इच्छुक दानदात्यांना करण्यात येत आहे.

23/3/23

**(डॉ. ए. एस. चंद्रमौली)**
**वित्त व लेखा अधिकारी(प्र.)**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

प्रतिलिपी :- सर्व विभागप्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे माहितीस्तव व कार्यवाहीस्तव अग्रेषीत.

E:\Investments\Gold medal files/L-03circular